


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com





वर्ष ३ रे    अंक :९०६ वा    सोमवार दि.३० सप्टेंबर २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयात विकास कामे अपूर्ण तरीही १०० टक्के बिल केले अदा

## मॉड्यूलर ओटी व लेबर रूममध्येही जिल्हा रुग्णालयात प्रचंड भ्रष्टाचार...

### यह तो झाकी हैं पिक्चर अभी तो बहोत बाकी हैं...

**जिल्हा सामान्य रुग्णालयात काम पूर्ण झाल्याचा कांगावा करणाऱ्या त्या माननीय आदरणीय संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदारांनी स्पॉट वर येऊन ( नियमानुसार वर्क ऑर्डर व इस्टीमेट ) नुसार पूर्ण झालेले काम ऑन कॅमेरा दाखवावे शासकीय कामात करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणात दोषी असलेले ठेकेदारास ब्लॅक लिस्ट मध्ये टाकून करोडो रुपयांची व्याजासह वसुली करून शासन तिजोरीत जमा करा त्यावर फोजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी तक्रारकर्त्यांनी केली आहे**




**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात सुरू असेलल्या विविध विभागातुन भ्रष्टाचाराचा वेगवेगळ्या कहाण्या दिवसेंदिवस समोर येऊ लागल्या आ-हेत. यावरून हे स्पष्ट आहे की, जिल्हा सामान्य रुग्णालय हे काही अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराचे नंबर एकचे कुरण बनवून ठेवले आहे. जिल्हा रुग्णालयात तयार करावयाच्या मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर व लेबर रूम बांधण्याच्या प्रकारातही प्रचंड मोठा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. कारण काम दिल्यानंतर काम पूर्ण करण्याची मुदत संपून देखील मॉड्यूलर ओटी व लेबर रूमचे काम अर्धवट होऊन पडलेले आहे, परंतु काम अर्धवट असताना सुद्धा संबंधित त्या कंत्राटदारास मात्र १०० टक्के रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणात मोठा झोल झालेला असल्याचे आता सिद्ध होऊ लागले आहे.जिल्हा सामान्य रुग्णलयात येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता रुग्णालयाचे आधुनिकीकरण आवश्यक असल्याने येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर तसेच लेबर रुम तयार करण्याच्या कामाची निविदा काढण्यात आली होती. ही प्रक्रिया तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तडस तसेच निलंबित बहुचर्चित भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्या कार्यकाळात काढण्यात आली होती. या दोन्ही कामांना कागदोपत्री सुरवात देखील करण्यात आली होती. या बांधकामासाठी लागण-रे साहित्य येऊन पडले. मात्र आता वर्क ऑर्डर काढून अनेक महिने उलटून गेलेले आहेत. तरी-ही मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर तसेच लेबर रूमचे काम अद्यापही पूर्ण व कार्यान्वित झालेले नाही. वर्क ऑर्डर काढल्यानंतर हे काम ज्या कालावधित पूर्ण करावयाचे होते, त्याचीही मुदत आता संपून बरीच दिवस होऊन गेली आहे. या स्थितीत कंत्राटदारावर कारवाई करण्याऐवजी त्याला काम पूर्ण न होता ही १०० टक्के रक्कम अदादेखील करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तडस डॉक्टर सुभाष चव्हाण यांच्यासह बहुचर्चित निलंबित भांडारपाल प्रकाश बोथे यांचा या भ्रष्टाचारात समावेश असल्याचे स्पष्टपणे उघड झालेले आहे. मॉड्यूलर ओटी उभे न राहिल्यामुळे आज येथे येणाऱ्या रुग्णांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो आहे. जिल्हा रुग्णालयातील रुग्णांसाठी खरे तर यातून मोठी सुविधा होणार होती, मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांनी यातून स्वतःची सुविधाफ करून घेतल्याचे स्पष्ट होते आहे. या भ्रष्टाचारात निलंबित करण्यात आलेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांचाही सहभाग असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचे हे प्रकरण अत्यंत व्यापक आहे, यात काही दुमत नाही. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करीत असून, काही सामाजिक कार्यकर्ते या मुद्द्यावर वरिष्ठ अधिकारी तथा शास-नाचे लक्ष वेधण्याचे काम करीत आहे. मात्र, भ्रष्टाचाराचे खाऊन-खाऊन मस्तवाल झालेल्या अधिकाऱ्यांना मात्र काहीही फरक पडत नसल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे वरिष्ठ अधिकारी हे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.जिल्हा रग्णालयातील भ्रष्टाचार आता पूर्णपणे सूर्यप्रकाशात आलेला आहे. विद्यमान आरोग्य उपसंचालक (अकोला) डॉ. कमलेश भंडारी साहेब हे देखील जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराची चौकशी करणाऱ्या समितीचे सदस्य राहिलेले आहेत. या चौकशीत हा भ्रष्टाचार स्पष्टपणे उघड झाल्याचे बोलले जात आहे. मात्र, भ्रष्टाचाऱ्यांवर सरसकट कारवाई करण्याऐवजी केवळ भांडारपाल प्रकाश बोथे यांना निलंबित करून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत आहे. दुसरीकडे भांड़ारपाल प्रकाश बोथे

### पोस्टमार्टम १४४

या पठ्ठ्याने तर खरी आरोग्य विभागाची यंत्रणाच वेठीस धरल्याचे दिसून येत आहे. खात्रिलायक माहितीनुसार निलंबित भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हे आपल्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांना धमकावणीच्या स्वरात बोलले आहेत. यासंदर्भात एक दबक्या आवाजात चर्चा जिल्हा रुग्णालय व आरोग्य विभागात होताना दिसत आहे. एखादे विकास कार्य जर पूर्णच झालेले नाही आणि तो प्रोजेक्ट पूर्ण झाल्याचा अहवालच तयार झाला नाही, तर मग त्या कंत्राटदारास बिल अदा तरी कसे केले, असा प्रश्न यातून उपस्थित होत आहे. भांडारपाल बोथे हा महातिकडमबाज माणूस. भ्रष्टाचाराचा गटारात लोळून-लोळून नखशिखांत बरबटलेला व्यक्ति आहे. परंतु तरीही तो आपल्यावर कारवाई झाल्यास मी इतर अधिकाऱ्यांनाही गोत्यात आणतो असे म्हणत असेल तर चोर तर चोर, वरून शिरजोर अशी स्थिती निर्माण झाली आहे. यावरून स्पष्ट आहे की, या घोटाळ्यात अनेक वरिष्ठ अधिकारी देखील सामिल आहेत. त्यामुळे या सर्वांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच या सर्वांनी भ्रष्टाचाराच्या पैशातून जी अवैध चल अचल संपत्ती गोळा केली, ती तात्काळ विभागीय चौकशीत झालेल्या आदेशा प्रमाणे त्वरित जप्त करून लिलाव करावा व येणारी करोडो रुपयांची रक्कम शासन जमा करावी जोपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या विषय़ाचा पाठलाग करीतच राहणार आहे.

**काम दाखवा बक्षीस मिळवा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनची ऑफर**

दरम्यान, या भ्रष्टाचाराचा भंडाफोड केल्यानंतर भ्रष्ट अधिकारी व कंत्राटदार मोठ्या प्रमाणात आदळ आपट करीत असल्याचे दिसत आहे. काहींनी दैनिक जनसंचलन व सती न्यूजच्या संपादकीय विभागाला व व्यवस्थापनाला धमक्या देणे सुरू केले आहे. आमच्या बदनामीचा डाव आखला असल्याचा आरोप दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजवर करण्यात आला आहे. आमच्या कामात कुठलाही भ्रष्टाचार नाही, असा पोकळ दावाही संबंधित मंडळी करीत आहेत. परंतु हे काम करणारा कंत्राटदार व भ्रष्ट अधिकाऱ्यांना आव्हान आहे की, वर्क ऑर्डरनुसार काम झाल्याचे स्पष्टपणे दाखवून द्या, एकदा या कामाचे पब्लिक ऑडिट होऊ द्या. जर हे काम योग्य पद्धतीने झाले असेल, तर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज संबंधितांना या कामासाठी इनाम देण्यास तयार आहे. हिम्मत असेल तर हे आव्हान कंत्राटदार किंवा भ्रष्ट अधिकाऱ्यांनी स्वीकारून दाखवावे.

अजून बरेच काही पुढील भागात...

---

# करवंड ते शेलसूर पांदण रस्त्यात भ्रष्टाचाराचा चिखल!

## तब्बल २० लाखांच्या अर्धवट रस्त्यात कुणी केले हात ओले?

**जनसंचलन/चिखली**

ग्रामीण भागातील शेतकरी पूर्वीपासून शेतात ये-जा करण्यासाठी तसेच मालाची ने-आण करण्यासाठी पांदन रस्त्याचा वापर करीत असत. मात्र, गत काही वर्षापासून पांदन रस्त्यांची प्रचंड दुरा-वस्था झाल्याची ओरड आहे.विशेषता चिखली मतदारसंघातील करवंड ते शेलसूर पांदन रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत.हा पांदण रस्ता करण्यासाठी तब्बल १९ लाख ९८ हजार ९४३ रुपये मंजूर झाले होते.परंतु हा रस्ता अर्धवट करण्यात येऊन निकृष्ट दर्जाचा झाल्यामुळे पावसाळी दिवसात शेतकऱ्यांची दैना उडाल्याने प्रंचड रोष व्यक्त करण्यात येत आहे. शेतशिवारात जाणाऱ्या पारंपरिक रस्त्यांना पाणंद म्हणतात. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी बारमाही रस्त्याची गरज आहे. त्यामुळे शेतातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी शेतरस्ता किंवा पाणंद रस्ता आवश्यक असत-ो. अनेकदा पावसामुळे हे रस्ते वाहून जातात. त्यामुळे शेतापर्यंत ट्रॅक्टर किंवा अन्य यंत्रसामग्री नेणे, तयार झालेला शेतमाल बाजारपेठेपर्यंत नेणे कठीण जाते, हे लक्षात घेऊन शासनाने शेत पाणंद रस्त्याची योजना अंमलात आणली आहे.परंतु लोकप्रतिनिधी व यंत्रणा आणि संबंधित ठेकेदार यांच्या कमिशन राजमुळे रस्ता निकृष्ट दर्जाचा बनल्याचा आरोप करवंड व शेलसूर येथील शेतकऱ्यांनी केला आहे.यासंदर्भातील व्हिडिओ देखील व्हायरल झाला आहे. करवंड ते शेलसूर दरम्यानच्या पानांद रस्त्यात चिखलाचे प्रचंड साम्राज्य असल्याने रस्त्याने पायदळ सुद्धा जाता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.दरम्यान सदर रस्ता निकृष्ट दर्जाचा झाला असून हा रस्ता करणाऱ्या ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच या रस्त्याच्या प्रकरणात सखोल चौकशी व्हावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा बाजार समितीची वार्षिक आमसभा संपन्न...

## शेतकरी हिताचा विकासरथ पुढे नेणार - जालिंदर बुधवत

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आतापर्यंत झालेली विकास कामे ही सर्व संचालक, कर्मचाऱ्यांच्या व शेतकऱ्यांच्या सहकार्य आणि विश्वासामुळे करता आलेली आहेत. हा शेतकरी हिताचा विकासरथ यापुढेही जोमाने पुढे नेणार असे अभिवचन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जालिंदर बुधवत यांनी दिले. बुलढाणा कृषी उत्पन्न बाजार समितीची आमसभा आज उत्साहात पार पडली. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली. गेल्या ९ ते १० वर्षात बुलडाणा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदि श्री जालिंदर बुधवत यांनी पदभार स्वीकारल्यापासून विकास कामांच्या माध्यमातून बाजार समितीचा कायापालट झालेला आहे. आज दिनांक २९/९/२४ रोजी शेतकरी भवन, बाजार समिती बुलडाणा येथे सभापती जालिंदर बुधवत यांच्या अध्यक्षतेखाली व उपसभापती सौ आशाताई नंदू शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण (आमसभा) सभा संपन्न झाली. यावेळी बाजार समितीचा लेखा जोखा वाचन करण्यात आला. सभापती जालिंदर बुधवत यांनी आगामी काळात होणाऱ्या विकास कामाबाबत चर्चा करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी जाणून घेतल्या. त्यावर उपाययोजना करण्यासाठी चर्चा केली. बुलढाणा बाजार समितीला आज राज्यभरातून विविध मान्यवर भेटी देतात. सहकार क्षेत्रात बदल करू पाहणाऱ्या आणि आपल्या भागातील बाजार समितीसाठी काय करता येईल यासाठी अभ्यास चमू देखील बुलढाणा बाजार समितीमध्ये येऊन पाहणी करतात. इथला बदल जाणून घेतात. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. हे काम सर्वांच्या सहकार्यामुळेच आपण करू शकलो. यापुढे कुठल्याही विकास काम करताना राजकारण आपण आड येऊ देणार नाही अशी ग्वाही जालिंदर बुधवत यांनी यावेळी दिली. या आमसभेला बाजार समितीचे संचालक श्री लखन गाडेकर, श्री संजय दर्डा, श्री प्रशांत गाढे, श्री शेषराव कानडजे, श्री माणिकराव खांडवे, श्री सुनील सोनुने, श्री हरी सिनकर, सचिव वनिता साबळे यांच्यासह ग्राम पंचायतीचे सरपंच, सहकारी सोसायटीचे अध्यक्ष, अडते, व्यापारी, हमाल, मापारी व बाजार समितीचे कर्मचारी वृंद उपस्थित होते

# दिव्यांग सेवाभावी बहुउद्देशीय संस्थांच्या वतीने मलकापूर तालुका व शहर कार्यकारणी जाहीर.



**जनसंचलन/मलकापूर**

दिव्यांग सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेचे उपाध्यक्ष नागेश सुरंगे यांच्या उपस्थितीमध्ये आज रोजी दिव्यांग सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मलकापूर तालुका व शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली. त्यास अनुषंगाने मलकापूर तालुका अध्यक्षपदी रवींद्र जंगले यांची निवड तर मलकापूर शहर प्रमुख पदी सुनील इंगळे, महिला शहर प्रमुख पदी पूनम भारंबे, तसेच बेलाड शाखा प्रमुख पदी निलेश संभारे, उपप्रमुख पदी संतोष इंगळे, सचिव पदी गंगाधर डांबरे, सहसचिव पदी विष्णू संभारे, कोषाध्यक्षपदी पदमाकर संभारे यांची निवड करण्यात आली. संस्थेचे उपाध्यक्ष नागेश सुरंगे त्यांनी भावी वाटचालीस पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच त्या अनुषंगाने गा-वातील ग्रामपंचायत दिव्यांगाच्या ५% निधी बाबत चर्चा करून तात्काळ दिव्यांग सेवाभावी बहुद्देशीय संस्थेचे उपाध्यक्ष नागेश सुरंगे यांनी ग्रामसेवक यांच्याशी दूरध्वनी क्रमांकावरून संवाद साधून येत्या त्यांनी सांगितले लवकरच दिव्यांगाचा ५% टक्के निधी वाटप करण्यात येईल असे सांगण्यात आले.तर त्यावेळी दिव्यांग सेवाभावी बहुद्देशीय संस्थेचे उपाध्यक्ष नागेश सुरंगे, रवींद्र जंगले, सुनील इंगळे, निलेश संभारे, संतोष इंगळे, गंगाधर डांबरे, विष्णू संभारे, पदमाकर संभारे, अमर सालवानी, पुनम भारंबे महिला शहरप्रमुख, इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# वानराचा अपघातात मृत्यू...

## धरणगाव येथील हनुमान सेनेच्या कार्यकर्त्यांनी वानराला विधिवत अंत्यसंस्कार करत दिला निरोप...

**जनसचंलन/मलकापूर**



हिंदू धर्मात हनुमानाचा अवतार अशी धारणा असलेल्या वानराचा चार चाकी वाहनाच्या धडकेत धरणगाव येथे मृत्यू झाला.धरण-गाव येथील हनुमान सेनेच्या कार्यकर्त्यांनी व गावकऱ्यांनी या वानराची विधीवत अंत्ययात्रा काढत अंत्यसंस्कार केले.वा-हनाची धडक बसल्यानंतर वानर काही वेळ जिवंत होते.नागरिकांनी धाव घेत या वानराला पाणीदेखील पाजलं मात्र दुर्दैवाने या वानराला वाचवण्यात अपयश आले. वानराचा मृत्यू झाल्याने हनुमान सेनेच्या कार्यकर्त्यांनी व गावकऱ्यांनी एकत्रित येत या वानराचा अंत्यविधी विधीवत अंत्यसंस्कार केला यावेळी हनुमान सेनेचे सचिन मोळे, निवृत्ती कवळे,वामन कवळे, अमोल पाटील, अमोल मोरे, प्रशांत पाटील व समस्त गावकरी उपस्थित होते.

# सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघासाठी आंबेडकरी चळवळीने बांधली वज्रमूठ...

## रामदास कहाळे यांच्या रूपाने आजाद समाज पार्टी कांशीराम कडून उमेदवार रिंगणात

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजू लागले आणि गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेल्या नवख्या उमेदवारांनी तर काहींनी नोकऱ्या सोडल्या लाख-ो रुपयाच्या नोकरीला लाथ मारून विधानसभेचे मुक्ताफळे चाखण्यासाठी वेगवेगळ्या विधानसभा शोधल्या परंतु गेल्या कित्येक दिवसापासून हाडामासाचा कार्यकर्ता ग्रामपंचायत सदस्य उपसरपंच ते सरपंच व पत्रकारिता क्षेत्रात नावारूपाला आलेले व सिंदखेड राजाचे आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते तथा पत्रकार रामदास कहाळे यांच्या रूपाने खासदार भाई चंद्रशेखर आझाद संस्थापक अध्यक्ष आजाद समाज पार्टी कांशीराम कडून उमेदवारीची माळ गळ्यात पडल्याने आंबेडकरी जनतेत आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले आज दिनांक २५ सप्टेंबर २० २४ रोजी दुपारी बारा वाजता मातोश्री लॉन्स येथे भव्य मेळावा पार पडला या मेळाव्यात पक्षाचे जिल्हाध्यक्ष भाई सिद्धांत वानखेडे सह कार्यकर्ते उपस्थित होते याव-ेळी ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत प्रथम त्यांचे स्वागत करण्यात आले व प्रथम मा जिजाऊ साहेब डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज या मान्यवरांच्या पुतळ्यांना हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमात माननीय सिद्धांत वानखेडे यांनी आपला आझाद समाज पार्टीचा उमेदवार रामदास कहाळे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आ-वाहन उपस्थित कार्यकर्त्यांना केले आपण आपण वाढविलेले एकही मत पक्षाचा एकूण संख्येत वाढच करेल व आपल्या उमेदवाराला विजयाच्या दिशेने परिसराच्या अनेक समस्या गेल्या कित्येक दिवसापासून पेंडिंग आहेत त्या समस्या जर मार्गी लावायच्या असतील समाजाला न्याय द्यायचा असेल तर आपल्या सर्वांना माता-भगिनींना आबाल वृद्धांना आता रामदास कहाळे यांच्या रूपाने नवीन चेहरा सिदखेडराजा



मतदारसंघात पक्षाने दिलेला आहे आणि पक्षाच्या आदेशाप्रमाणे आपण कार्य केल्यास आपला प्रश्न मार्गी लावू व आपला उमेदवार विधानसभेत पाठवावा असे आवाहन यावेळी अध्यक्ष भाषणात भाई सिद्धांत वानखेडे यांनी केली. याव-ेळी त्यांच्यासोबत पदाधिकारी उपस्थित होते यावेळी सर्वांनी आपल्या मनो-गतात भाई सिद्धांत वानखेडे यांनी सांगितल्याप्रमाणे आपण सर्वांनी एकजुटीने एका दिलाने मतदार संघात आपला उमेदवार निवडून आणण्यासाठी पायाला भिंगरी बांधून फिरावे असे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमात गावकरी तथा पंचक्रोशीतील शेकडो नागरिक महिला पुरुष उपस्थित होते




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

## सशक्त भारत घडविण्यासाठी सकस आहार महत्वाचा !

# जिजामाता महाविद्यालयात कुपोषणमुक्तीचा जागर

**जनसंचलन/बुलढाणा**

आहारामध्ये पोषण मूल्यांची रुजवात होणे अत्यावश्यक असून सशक्त भारत घडविण्यासाठी सकस आहार महत्त्वाचा असल्याची मार्गदर्शक सूचना प्रा.डॉ. सुरेश गवई यांनी केली. जिजामाता महाविद्यालयात २८ सप्टेंबरला आयोजित पोषण आहार प्रदर्शनीत ते उद्घाटक म्हणून बोलत होते. राष्ट्रीय पोषण आहार प्रदर्शनीच्या माध्यमातून विस्मृतीत जात असणाऱ्या पौष्टिक भारतीय पाककृतींच्या प्रदर्शनीने काल जिजामाता महाविद्यालयात अनेकांचे लक्ष वेधले! प्राचार्य डॉ. सुरेश गवई यांच्या हस्ते उद्घाटित झालेल्या या आहार पोषण प्रदर्शनीला उस्फूर्त प्रतिसाद लाभला असून,यावेळी कुपोषणमुक्तीचा जागर करण्यात आला. शरीराला योग्य ते पोषण मिळावं आणि तंदुरुस्त राहावं अशी आपली सर्वांचीच इच्छा असते. त्यासाठी आपण आपल्यापरीने प्रयत्न देखील करत असतो.पण आपली जीवनशैलीच अशी आहे की त्यात अनेकदा आपलं आपल्या आरोग्याकडे आणि आहाराकडे सर्वाधिक दुर्लक्ष होतं. चुकीच्या वेळी आणि चुकीच्या पदार्थांच्या सेवनाने बिघडलेली जीवनशैली पुन्हा रुळावर आणणं हे आपल्यासाठी एक मोठं आव्हानच आहे. याच पार्श्वभूमीवर, आपल्या शरीराला असणाऱ्या पोषणाच्या गरजेविषयी लोकांना माहिती देण्यासाठी



विविध जागरूकता उपक्रम आयोजित केले जात असतात.येथील जिजामाता महाविद्यालयात देखील शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागाने २८ सप्टेंबरला आहार पोषण प्रदर्शनीचे आयोजन केले होते.याप्रसंगी विज्ञान शाखा प्रमुख व रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.संतोष कुंभारे,कला शाखाप्रमुख डॉ. जे.जे.जाधव, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुबोध चिंचोले, प्रा.संजय सावळे, डॉ.देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आहारामध्ये पोषण मूल्यांची रुजवात होणे अत्यावश्यक असून सशक्त भारत घडविण्यासाठी सकस आहार महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ. सुरेश गवई यांनी केले. कला विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखेतील विद्यार्थ्यांनी प्रदर्शनीत सहभाग घेऊन योग्य पोषण आहाराचा जागर केला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन लोहटे,महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.राजश्री येवले, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. प्रदीप वाघ सह कार्यक्रम अधिकारी प्रा.रामेश्वर बनकर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी पुढाकार घेतला.

# मेहकर येथे रोजगार मेळाव्याला प्रतिसाद

**जनसंचलन/मेहकर**

कौशल्य विकास विभागाच्या वतीने स्थानिक औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे २६ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण व रोजगार भरती मेळावा घेण्यात आला. यावेळी अनेक उमेदवारांनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्चना वरणकर होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. विजयश्री सावजी, प्रा. जुगराज पढे यांची उपस्थिती होती. प्रा.गजानन वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पढे यांनी विद्यार्थ्यांना महास्वयम पोर्टलवर नोंदणी कशी करावी, प्रशिक्षणाच्या संधी कशा आणि कुठे उपलब्ध होतील याबद्दल माहिती दिली. या योजनेत सहभागी युवकांना प्रतिमाह १० हजार रु. पर्यंतचे विद्यावेतन सुद्धा मिळणार असल्याचे सांगुन, युवक आत्मनिर्भर बनून बेरोजगारीच्या समस्येपासून मुक्त व्हावेत व देशाच्या




विकासात सहभागी व्हावेत ही शासनाची भूमिका असल्याचे सांगितले. प्रा. सावजी यांनी, प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रा. किशोर क्षीरसागर, प्रा. ज्ञानेश्वर पाटणकर, प्रा. सुरभी देशपांडे, प्रा. अंकुर अवसरमोल, प्रा. राजेश गाडेकर, प्रा. विशाल आंबेकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत घेण्यात आलेल्या रोजगार मेळाव्याला प्रतिसाद मिळाला. सचिन व्हर्गर यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जलआपत्ती रक्षकांना पोलिसांचा सॅल्यूट !

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

कुठलीही नैसर्गिक आपत्ती आली तर आपल्या जीवाची पर्वा न करता तत्काळ मदतीसाठी धाव घेते ते पिंजर येथील संत गाडगेबाबा आपात्कालीन शोध व बचाव पथक ! या पथकाने आमना नदीपात्रात सतत दोन दिवस शोध घेऊन २० किलोमीटर पर्यंत पायी प्रवास करून वाहून गेलेल्या बापलेकांचा मृतदेह शोधून काढल्याने या अवघड आणि तत्पर सेवेला देऊळगाव राजा पोलिसांनी सॅल्यूट ठोकला आहे ! आपत्ती ओढवली तर त्याचा प्रतिकार करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपत्ती कधीही येऊ शकतात. त्या नियोजित नसतात.परंतु योजनाबद्ध प्रयत्नांनी त्यांचे निवारण होऊ शकते. परंतु दुर्दैवाने परतीच्या पावसाने बापलेकाचा घात केला. ५ वर्षाचा चिमुकला अथर्व दीपक निकाळजे व त्याचे वडील दीपक प्रल्हाद निकाळजे वय २८ हे पुरात वाहून गेले होते. सतत दोन दिवस त्यांचा मृतदेह सापडला नाही.परंतु मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाउंडेशन अंतर्गत संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथक पिंजर जिल्हा अकोलाचे प्रमुख दीपक सदाफळे यांनी आता परिश्रम घेत चिमुकल्या अथर्वचा चिंचोली बुरुकुल शिवारातून तर त्याचे वडील दीपक निकाळजे यांचा पिंपळखुटा शिवारातील आमना नदीपात्रात मृतदेह शोधून काढला.या शोध मोहिमेचा वीस किलोमीटर पर्यंतचा पायी प्रवास सोपा नव्हता. शिवाय पाण्याच्या प्रवाहात या पथकाने जीव धोक्यात टाकून मृतदेह शोधून काढला.दरम्यान देऊळगाव



राजा पोलीस निरीक्षक संतोष महल्ले व उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी मुख्य शोध मोहिम राबविणारे मानवसेवा आपत्ती व्यवस्थापन फॉऊंडेशन संत गाडगेबाबा आपतकालीन शोध व बचाव पथक पिंजर जिल्हा अकोलाचे दिपक रामकृष्ण सदाफळे व त्यांचे सहकारी मयुर सळेदार, धिरज राऊत, शेखर केवट, निखील बोबडे, मयुर कळस्कर, अश्विन केवट, निलेश खंडारे, महेश वानखेडे या टीमचे अभिनंदन करून शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला आहे.

# नॉन ओव्हन बॅग निर्मिती उद्योगात कोमल ठरली यशस्विनी!

**जनसंचलन/बुलढाणा**

मलकापूर येथील कोमलने उच्च शिक्षण घेऊन एक यशस्वी उद्योजिका म्हणून ओळख निर्माण केली आहे. डिप्लोमा केल्यानंतर शेगाव येथे कम्प्युटर इंजीनियरिंग पूर्ण केलेल्या कोमल साठी नोकरी कुठेही सहज उपलब्ध झाली असती मात्र दुसरा पर्याय म्हणून तिने स्पर्धा परीक्षेची तयारी व अभ्यास पुणे येथे सुरू केला दोन-तीन प्रयत्नांमध्ये तिने प्रिलिम्स पर्यंत झेप देखील घेतली. अशातच लग्नासाठी चांगले स्थळ चालून आल्याने मलकाकपूर तालुक्यातील वरखेड येथील इंजिनिअर सचिन तायडे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. कोमल आपल्या संसारात रमली खरी मात्र घेतलेले उच्च शिक्षण आणि मनातून काहीतरी करण्याची उर्मी तिला स्वस्थ बसू देईना ! नोकरी न करता उद्योग व्यवसायातून सुरुवात करायची असे तिने ठरविले. पीडब्ल्यूडी मध्ये डेप्युटी इंजिनियर असणारे पती आणि सासरकडील सर्व मंडळींनी उत्साह आणि प्रोत्साहन दिले. उद्योग करत असताना दोन गोष्टी काळजीपूर्वक कोमलने लक्षात ठेवल्या त्या म्हणजे आपल्या आर्थिक सक्षमीकरणाबरोबरच इतर काही गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून द्यायचा आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या उद्योग व्यवसायामधून पर्यावरणाचे संतुलन बिघडणार नाही याची काळजी घ्यायची. नेमका कुठला व्यवसाय सुरू करावा हे ठरवत असताना शासनाने नॉन ओव्हन बॅग वरील बंदी उठविल्याचे समजले आणि या व्यवसायाच्या दृष्टीने चौकशी सुरू केली. यासाठी आवश्यक असणाऱ्या मशीन पाहण्यासाठी सुरत राजकोट येथे देखील जाऊन आली. खामगाव येथे फॅक्टरी उत्पादन सुरू केले असताना महिला कामगारांसंदर्भात सुरुवातीपासूनच ज्यांना जो वेळ आहे त्या वेळेत येऊन काम करायचे अशी अट ठेवल्यामुळे प्रत्येक महिलेला जसा वेळ मिळेल तशा त्या येऊ लागल्या यामुळे



असं झालं की घरकाम किंवा इतर छोटे मोठे उद्योग सांभाळून बॅग उत्पादनातून महिलांना रोजगार मिळू लागला आणि त्यांची होणारी धावपळ देखील थांबली. ३८ लक्ष या योजनेतून मिळालेले कर्ज असताना त्यावर दहा लक्ष पर्यंत शासनाचे अनुदान होते या सुवर्णसंधीचा कोमलने फायदा घेतला. मागील वर्षी जवळपास १४ लक्ष रुपयांची आर्थिक उलाढाल झाली शिवाय यावर्षीची प्रस्थापित आर्थिक उलाढाल २५ लक्ष एवढी आहे. यातून अनेक महिलांचे संसार उभे राहिले आणि कोमलने मनात ठरवलेली यशस्वी उद्योजिका होण्याची गोष्ट प्रत्यक्षात साकारली.

# सचिन खंडारे यांना महाराष्ट्ररत्न राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील साखरखेर्डा जवळील शिंदी येथील पत्रकार सचिन मधुकर खंडारे यांना जळगाव खान्देश जिल्ह्यातील भुसावळ येथील अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्था भुसावळ यांचा मानाचा उत्कृष्ट पत्रकारिता व सामाजिक कार्यासाठी महाराष्ट्र रत्न राष्ट्रीय पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आला आहे,सदर अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष सौ जयश्रीताई इंगळे यांनी सदर पुरस्कार जाहीर झाल्याचे पत्र दिनांक २९ सप्टेंबर रोजी दिले आहे,त्यामुळे एका वर्षामध्ये पत्रकार सचिन खंडारे यांना मिळालेला हा दुसरा पुरस्कार आहे,सचिन खंडारे हे गेल्या बारा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उत्कृष्टरित्या काम करीत आहे,शेती,विद्यार्थी,पालक,, गाव पातळीवरील रस्त्याच्या समस्या पिण्याच्या पाण्याच्या समस्या नागरिकांच्या समस्या तहसील दवाखाना यांच्या समस्या त्या सर्व समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून सचिन खंडारे सातत्याने मांडत असतं, त्यामुळे अनेकांचा रोष सुद्धा त्यांनी पत्करला आहे या सर्वांची तमा बळकता त्यांचे लेखणीचे काम सुरूच आहे,लेखणी बरोबरच सामाजिक क्षेत्रामध्ये सुद्धा काम करत असतात यामध्ये रक्षाबंधनाच्या सणाच्या दिवशी तालुक्यातील जनुना तांडा येथे वंचित दीनदुबळ्या महिलांना दरवर्षी ते पन्नास साड्याचे वाटप करत असतात .दिवाळीला गरिबांना किराणा किट वाटप करत असतात,रक्तदान शिबिरे,विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांना पुरस्कार अनेक सामाजिक कार्यक्रम ते घेत असतात, आणि याच कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्ररत्न राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला आहे, नोव्हेंबर मध्ये सदर भुसावळ येथील शानदार कार्यक्रमांमध्ये अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सदर पुरस्कार प्रदान केला जाणार आह

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्याच्या बळीराजांचा राज्यात डंका !

## काळ्या मातीतील भूमिपुत्रांची सोन्या परीस कर्तबगारी आज राज्यपालांच्या हस्ते होणार ८ शेतकरी पुरस्कृत!

**जनसंचलन/बुलढाणा**

काळ्या मातीसाठी झटणाऱ्या जिल्ह्यातील कृषी सहाय्यकासह ८ कर्तबगार शेतकऱ्यांना आज सायंकाळी राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. ही बाब निश्चितच गौरवास्पद असून बुलढाण्याचा डंका राज्यात वाजत आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यात कृषी, फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी,व्यक्ती, संस्था तसेच अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या कृषी पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आज २९ सप्टेंबर रोजी सायं. ५ वा. मुंबई येथील नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया (डोम) वरळी येथे आयोजित करण्यात आला आहे. कोविड तसेच विविध कारणांमुळे प्रलंबित असलेले राज्यातील सन २०२०,२०२१ व २०२२ या तीन वर्षांतील पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे, रोजगार हमी मंत्री दादा भुसे, मुंबईचे पालकमंत्री व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वितरित होणार आहे.यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील विविध कृषी पुरस्कारांसाठी ८ शेतकऱ्यांची निवड झाली आहे.

१) विठ्ठल रामेश्वर धांडे (पद्मश्री डॉ. विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार २०२०), कृषी सहाय्यक मेहकर २)



शशिकांत पुंडकर,(वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार २०२०), येऊलखेड ता. शेगाव ३)कैलास नागरे (युवा शेतकरी पुरस्कार २०२०),शिवनी आरमाळ तालुका देऊळगाव राजा ४)गणेश लंबे (वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार तालुका मेहकर ५)पांडुरंग देविदास शिंदे (कवी भूषण सेंद्रिय शेती पुरस्कार २०२१),मंगरूळ तालुका चिखली ६)प्रकाश रणीत (युवा शेतकरी पुरस्कार २०२१), कोकलवाडी तालुका नांदुरा ७)शिवाजी भाकरे (वसंतराव नाईक शेती निष्ठ पुरस्कार २०२१),कंडारी तालुका नांदुरा ८)देविदास जाधव (वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सर्वसाधारण गट २०२२),भूसर तालुका मोताळा




# लक्ष्मीनारायण आपार्टमेंट तर्फे आमदार संजय गायकवाड व सरपंच देवा भाऊ दांडगे यांचा सत्कार समारंभ....



**जनसंचलन/बुलढाणा**

समस्त लक्ष्मीनारायण अपार्टमेंट तर्फे आज २९ सप्टेंबर रोजी बुलढाणा विधानसभेचे आमदार संजय गायकवाड तसेच नवनियुक्त सरपंच देवा भाऊ दांडगे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. बुलढाणा मतदारसंघात विक्रमी विकास कामे केल्याबद्दल आमदार संजय गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला तसेच सावंत ग्रामपंचायत सरपंच पदी बिनविरोध देवा हो दांडगे यांची सुद्धा निवड झाली त्याबद्दल सुद्धा त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आपार्टमेंट तर्फे काही मागण्या आमदार संजय गायकवाड यांना अपार्टमेंट तर्फे करण्यात आल्या होत्या त्या मधल्या बऱ्यापैकी मागण्या आमदार संजय गायकवाड पूर्ण करीत आलो आहे असे सांगितले.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे पुतणे योगेश जाधव निवडणूक मैदानात !

## डॉ.राजेंद्र शिंगणे यांना विधानसभा निवडणूक जड जाण्याची शक्यता !





**जनसंचलन/बुलढाणा**

मातृतिर्थ सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात अनेक जण निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. परंतु केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे पुतणे योगेश जाधव निवडणूक मैदानात उतरल्याने व त्यांना मिळत असलेल्या युवाशक्तीमुळे ते बलाढ्य उमेदवार ठरून मैदान मारण्याची संभावना असल्याने आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांना यंदाची विधानसभा निवडणूक जड जाऊ शकण्याची चिन्ह दिसून येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच इच्छुक उमेदवार कामाला लागलेत. परंतु पितृपक्षानंतर पक्षश्रेष्ठींच्या राजकीय खेळीला खरी सुरुवात होणार आहे. विधानसभा निवडणूक घोषित होण्यासाठी अद्याप अवधी बाकी आहे. अपवाद वगळता पक्षांनी जागावाटप देखील केलेल्या नाहीत.परंतु उमेदवारी मिळविण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडे वारी सुरु आहे. दरम्यान केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे पुतणे योगेश जाधव यांनी जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. त्यांच्याकडे युवावर्ग आकर्षित होत असून मतदार संघ देखील युवा आमदाराच्या शोधात दिसत आहे.महायुती मधील घटक असलेले आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या भूमिकेकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. ते महायुतीकडून लढणार की महाविकास आघाडीकडून अथवा अपक्ष लढणार याबद्दलची चर्चा रंगत आहे. महायुतीकडून निवडणूक लढविली तर माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर व माजी आमदार तोताराम कायंदे यांचे पुत्र डॉ. सुनील कायंदे व भाजपचे प्रवक्ते विनोद वाघ यांना निवडणुकीत थोडी अडचण होणार आहे.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटाकडून लढलेच तर मार्ग मोकळा होणार असलातरी ही जागा भाजप की शिंदे सेना लढविणार? हा प्रश्न आहे. शिवाय शरद पवार यांच्याकडे गायत्री शिंगणे उमेदवारीसाठी वारी करून आल्याने त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे.